**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५७/२०१६ मधील निशाणी क्र. ४६ वरिल आदेश</u>**
(हाफिजअली सैय्यद व इतर वि. कमरअली सैय्यद व इतर)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ मयत सिराज हुसेन मुस्ताफाअली सैय्यद यांचे वारस फैलावर घेण्यास उशीर माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १६.०२.२०२२ रोजी मयत झाले. वादी यांना वारस रेकॉर्डवर घेणेबाबत कायदेशीर माहिती नव्हती. प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. दावा गुणदोषावर निकाल होणेकामी वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे. सबब प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठीचा विलंब माफ करण्याची विनंती केली.

**०२.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करून कथन केले की, वादीने दाखल केलेला अर्ज खरा, प्रामाणिकपणाचा व कायदेशीर नाही. वादीस अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडले नाही. प्रतिवादी क्र. ४ हे सुमारे ११ महिन्यापुर्वी मयत झाले आहेत. वादीने दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी व प्रतिवादीस न्यायापासून वंचित ठेवण्यासाठी सदर अर्ज उशीरा दाखल केला आहे. सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्यात याव. यदाकदाचित अर्ज मंजुर करण्याचे मे. न्यायालयाचे मत झाल्यास वादीस रक्कम रूपये पाच हजार इतकी कॉस्ट करण्याची विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दावा हा ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ४७ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १६.०२.२०२२ रोजी मयत झाल्याचे वादीने कथन केलेले आहे. मुदतीच्या कायदान्वये ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. वादीचा अर्ज दिनांक १९.०१.२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस निश्चितच विलंब झालेला आहे.

**०४.** प्रस्तुत दाव्यामध्ये गावमौजे मंचर येथील सिटी सर्वे क्रमांक ४०१ पैकी ३६—१४ चौ. मी या क्षेत्राचे वादी हे मालक असल्याचा जाहीर ठराव वादीने मागितला आहे. दाव्यामध्ये मिळकतीचे व कायदेशीर हक्काचे प्रश्न असल्याने, न्यायाच्या दृष्टीने दाव्यामधील आवश्यक पक्षकार त्यांचे वारस आणि त्यांचे म्हणणे पुरावे दाव्याकामी समाविष्ट करून घेणे हे दाव्याचा गुणदोषावर अंतीम निकाल

होण्याकामी आवश्यक आहे. दाव्यामध्ये मिळकतीबाबत असलेला कायदेशीर हक्क अधिकार याबाबतचे प्रश्न महत्वपुर्ण आहेत. सबब वारस दाव्याकामी समाविष्ट करण्याकरीता विलंब माफ करणे आणि त्यांना दावा चालवणे कामी संधी देणे योग्य होणार आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ४६ खर्च रक्कम रूपये १००/— भरण्याच्या अटीवर मंजुर करून प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस फैलावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

२. खर्च रक्कम रूपये १००/— प्रतिवादी यांना देण्यात यावी.

दिनांक: ०९.१०.२०२३

(**एम. ए. के. शेख**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव